**राष्ट्रीय कल्याण निधी या केंद्र पुरस्कत योजनेखाली**
**<u>मच्छिमारासाठी घरे व कूपनलिका बांधण्याबाबत</u>.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः-मत्स्यवि- ३६९२/(सीआर-१/पदुम-१४,**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांकः- २२ नोव्हेंबर,१९९६.**

**वाचाः-** १. अवर सचिव, भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.१२०१२/१/९६/एफवाय (डब्ल्यु), दिनांक २५.३.१९९६.
२. अवर सचिव, भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.१२०३५/८/९५/ एफवाय (डब्ल्यु), दिनांक १६.४.१९९६.
३. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.०७२१०१/११२/११२९१, दिनांक २०.३.१९९५ व दिनांक २/५/१९९६.

**<u>शासन निर्णयः</u>-**

केंद्र शासनाने, राष्ट्रीय कल्याण निधी या केंद्र पुरस्कत योजनेतर्गत मच्छिमारांसाठी आदर्श मच्छिमार गावांचा विकास करण्याच्या उददेशाने मच्छिमारांसाठी घरे बांधण्यासाठी रुपये ३५,०००/- इतक्या मर्यादेपर्यंत (प्रत्येक घर) आणि प्रत्येक मच्छिमार गावांत एक कूपनलिका बांधण्यासाठी रुपये २५,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्याची योजना मंजूर कली आहे. सदर अर्थसहाय्य केंद्र व राज्य शासनाकडून ५०:५० या प्रमाणात देण्यात येणार आहे. रायगड जिल्हयातील एक गाव व जळगांव जिल्हयातील सात मच्छिमार गावात एकूण २७१ घरे व ०८ कूपनलिका बांधण्याच्या रु. ९६,८५,०००/- (रुपये शहाण्णव लाख पंच्याऐंशी हजार फक्त) इतक्या अंदाजित खर्चास शासन मान्यता देत आहे.

२. अर्थसंकल्पित तरतुद झाल्याखेरीज, प्रस्तावित कामावर खर्च करण्यात येवू नये.

३. यासंबंधीचा खर्च २४०५-मत्स्यव्यवसाय-१२०-मत्स्यव्यवसाय सहाकरी संस्था १२० (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (दोन) (नऊ) राष्ट्रीय कल्याण निधी याजनेंतर्गत मच्छिमारांसाठी

घरकुल योजना (दोन) राज्ययोजनांतर्गत योजना (२४०५१०४४) (तीन) केंद्र पुरस्कृत योजना (२४०५१०५३) या लेखाशिर्षाखाली करण्यात यावा.

४. हे आदेश नियोजन विभाग/वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या सहमतीने अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५४०/९६/व्यय-१,दिनांक १९/११/१९९६ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्टाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वि.रा.बचेरे)
अवर सचिव, महाराष्ट शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग.

प्रति,
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट राज्य, मुंबई
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, मुंबई/नाशिक
सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,अलिबाग
जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, जळगांव
महालेखापाल, महाराष्ट-१, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) मुंबई
महालेखापाल, महाराष्ट-२(लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा)नागपूर
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, संगणक कक्ष लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय इमारत,
मंत्रालयासमोर, मुंबई
कार्यासन अधिकारी, पदुम-१२,/पदुम-१३/पदुम-१६,कृषि व
पदुम विभग,मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती.